# Greenlawns School, Worli

**सहामाही परीक्षा (प्रथम सत्र २४-२५)**

**मराठी**

**इयत्ता :- सातवी** | **पूर्णांक:- ८०**

**दिनांक :- २६ .०९.२०२४** | **वेळ –२ तास**

**सूचना :- सगळे प्रश्न अनिवार्य आहेत.**

**शुद्ध भाषा व सुवाच्य लेखन अपेक्षित आहे.**

---

**प्रश्न १) खालील पैकी एका विषयावर निबंध लिहा :-. (१०)**

१. आपली समस्या प्रदूषण

२. माझा भारत

३. खरा मित्र

**प्रश्न २) खालील मुद्द्यांच्या आधारे गोष्ट तयार करून शीर्षक द्या :- (७)**

मुद्दे - दोन मांजरे ………. दोघांची चांगलीच मैत्री ………. त्यांना एक लोण्याचा गोळा दिसणे ……….. दोन्ही मांजरे आनंदाने उड्या मारणे ………. त्यांना प्रश्न पडणे ………. लोण्याची सारखी वाटणी करण्याचे प्रयास करणे ………. दोघांमध्ये भांडण …… माकडाने गंमत बघणे ……… माकडाला विनंती करणे……… माकड मदतीस तयार होणे……. वाटणी करतांना लोणी खाणे……..मांजरांचे निराश होणे…….तात्पर्य.

**प्र. ३ खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

सरदार पटेलांचे पूर्ण नाव वल्लभभाई झवेरभाई पटेल होते. त्यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी गुजरातमध्ये झाला. त्यांचे सुरूवातीचे शिक्षण नडियाद या शहरात झाले. नंतर ते इंग्लंडला गेले. तेथे ते बॅरिस्टर झाले.

भारतात आल्यावर वल्लभभाईनी वकिली सुरू केली. त्या वेळी वल्लभभाई गांधीजींच्या सहवासात आले. त्यांच्यावर गांधीजींचा खूपच प्रभाव पडला. त्यांनी वकिली सोडली आणि ते स्वातंत्र्यचळवळीत सामील झाले. त्यासाठी त्यांना खूप वेळा तुरूंगवास भोगावा लागला. वल्लभभाई पटेल लढाऊ स्वभावाचे होते. ते अनेक सत्याग्रह - आंदोलनात आघाडीवर होते. त्यांनी ' बारडोली' सत्याग्रहाचे नेतृत्व केले. तेव्हापासून त्यांना 'सरदार' असे म्हणतात.

सरदार पटेलांनी स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री व उपपंतप्रधान म्हणून कार्यभार सांभाळताना अतिशय मोलाचे योगदान देत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यांनी सर्व संस्थाने भारतात सामील केली. म्हणून त्यांना 'पोलादी पुरूष ' म्हणतात. ते १५ डिसेंबर १९५० साली स्वर्गवासी झाले.

**P.T.O.**

**प्रश्न :**

**1। सरदार पटेल यांचे पूर्ण नाव काय होते? त्यांचा जन्म कधी झाला ? (२)**

**2। त्यांनी वकिली कधी सुरू केली व कधी सोडली ? (२)**

**3। त्यांना सरदार असे का म्हणतात ? (२)**

**4। त्यांना तुरुंगवास कशासाठी भोगावा लागला? त्यांना पोलादी पुरूष का म्हणतात ? (२)**

**5। वाक्य बनवा : शिक्षण, शहर (२)**

## व्याकरण - विभाग

**प्रश्न ४) अ) समानार्थी शब्द लिहा :- (२)**

**१. हित २. मनीषा**

**आ ) विरुद्धार्थी शब्द लिहा :-. (२)**

**१. तेजस्वी २. निर्मूलन**

**इ) लिंग बदला :- (२)**

**१. शिंपी २. पंडिता**

**ई ) वचन बदला :-. (२)**

**१. पंथ २. बाहुली**

**उ) समूहदर्शक शब्द लिहा :- (२)**

**१. सैनिकांची - २. पक्ष्यांचा -**

**ऊ) म्हणी पूर्ण करा :- (१)**

**१. हाजीर तो ..................**

**ए) खालील वाक्यात नाम ओळखा :- (२)**

**१. मंदा लिहिताना नेहमी चुका करते .**

**२. समोरून माळढोक येत होता.**

## साहित्य - विभाग ( अंक – ४० )

प्रश्न ५ ) अ) खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :- (१२)

१. पंडिता रमाबाईंना स्त्रीजाती विषयी अपार प्रेम होते हे त्यांच्या कोणत्या उद्गारातून समजते ?

२. शिवारामध्ये गेल्यावर मुलांनी कोणकोणती पिके आणि फळझाडे पाहिली ?

३. श्यामचे डोळे अश्रूंनी का न्हाले होते ?

४. पंडिता रमाबाईंनी मुक्तीमिशनमध्ये स्त्रियांसाठी सुरू केलेल्या लहान उद्योगाची नावे लिहा ?

आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :- (४)

१. श्यामचे वडील वरचेवर दापोलीला कशासाठी जात ?

२. वैष्णवीचा वाढदिवस कधी होता ?

३. नवीन पाऊस सुरू होण्याचा मातीवर काय परिणाम होतो ?

४. पंडिता रमाबाईचा विवाह कोणाबरोबर झाला होता ?

इ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :- (३)

१. लहान भाऊ नवीन ------------ हट्ट धरुन बसला होता .

२. आज आमच्या शाळेत ---------- साजरा करण्यात आला .

३. या स्पर्धेमध्ये मी क्रांतीज्योती --------- फुले यांची वेशभूषा केली .

ई) कोण - कोणास म्हणाले :- (३)

१. " पावसापाण्याचा जाऊ नकोस ."

२." मग सांगेन. घरात जा घेऊन ."

३." पैसे रे कोठले ?कोणाचे कर्ज काढलेस ? का फीचे दवडलेस ?"

उ) शब्दार्थ लिहा :- (३)

१. स्मृती -

a. चव b. आठवणी c. आठवणा d. आकाश

२. अनुवाद -

a. प्रसिध्द b. अंतर c. भाषा d. भाषांतर

P.T.O.

३. फलद्रुप -

a. फळाला आलेली b. वाया घालवणे c. पूर्ण भरून वाहणे d. फळ खाणे

## कविता – विभाग

प्रश्न ६) अ) खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:- (४)

१. रानमेवा कुठे उगवला आहे ?

२. कवीच्या अंगणात कशाकशाची रास पडते ?

३. 'माझ्या अंगणात' या कवितेच्या कवीचे नाव लिहा.

४. कवी गुण्या गोविंदाने रानमेवा खायला का सांगत आहे ?

आ ) कोण ते लिहा :- (२)

१. शब्दांच्या घरात राहणारे -

२. अवतीभवती झिरपणारे -

इ) खालील दिलेल्या कवितेच्या ओळी पूर्ण करा:- (४)

कानोकानी ---------------------

-----------------------------

----------------------------

---------------------------- सुंदर घर.

ई) खालील दिलेल्या शब्दांचे यमक जुळणारे शब्द लिहा:- (२)

१. माय - २. रास -

उ)योग्य शब्दार्थ निवडून लिहा :-. (३)

१. हळवे -

a. हिरवे b.कोमल c.कमळ d.मेळ

२. शिणणे -

a.दाणे b.तोरा c.दूर उडणे d.थकणे

३. भान -

a. मान b.रान c.ध्यान d.कान

-----------×समाप्त ×----------------